# मेट्रो स्थानक भाड्याने देणे आहे!

## उत्पन्नवाढीसाठी मेट्रो रेल्वे महामंडळाचा निर्णय

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २२ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो- ३ मार्गावरील सिद्धिविनायक मंदिर या प्रस्तावित स्थानकाचा परिसर वाणिज्यिक वापरासाठी देऊन महसूल मिळवण्याचा नवा प्रस्ताव मुंबई मेट्रो रेल्वे मंडळाने तयार केला आहे. प्रवाशांची सर्वाधिक वर्दळ होणार असल्याने या स्थानकात अतिरिक्त मजला बांधून त्याचा व्यावसायिक वापर करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवण्यात येणार आहे.

मेट्रो- ३ मार्गावरील प्रस्तावित सिद्धिविनायक मंदिर स्थानक तीनमजली असेल; तळमजला आणि मुख्य मजल्यांमध्ये एक मजला बांधला जाईल. ही जागा वाणिज्यिक वापरासाठी देण्यात येणार आहे. किरकोळ दुकानदार, कार्यालये, बँका, शैक्षणिक संस्था, उपाहारगृहे आदी वाणिज्यिक वापरातून उत्पन्नवाढ साधली जाणार आहे. एमएमआरसीएला मेट्रो- ३ मार्ग सार्वजनिक पायाभूत सुविधा म्हणून चालवायचा आहे. त्यासाठी स्थानकाच्या परिसरात वाणिज्यिक वापर करण्याचा एमएमआरसीएलचा विचार आहे.

एमएमआरसीएलने सिद्धिविनायक मंदिर स्थानक परिसराच्या वाणिज्यिक वापराचा प्रस्ताव तयार केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. लवकरच हा प्रस्ताव एमएमआरसीएलच्या बैठकीत सादर केला जाणार असून, मंजुरी मिळाल्यानंतर तो राज्य सरकारकडे पाठवला जाणार आहे. मदत कक्षापर्यंत पोहोचण्यात नागरिकांना अडचणी येतात. त्यामुळे मेट्रो स्थानकाच्या परिसरात मदत कक्षासाठी जागा मिळावी, असा प्रस्ताव सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टने दिला होता. त्यावर विचार करताना मेट्रो स्थानकाचा वाणिज्यिक वापर करण्याची संकल्पना पुढे आली आहे.



### सिद्धिविनायक मंदिर स्थानक का?

**भाविकांचा मोठा ओघ असलेल्या प्रभादेवीतील सिद्धिविनायक मंदिरापासून अगदी काही अंतरावर मेट्रो स्थानक होणार आहे. या मंदिरात दररोज सुमारे २० हजार भाविक येतात; त्यांची संख्या मंगळवारी आणि संकष्टीच्या दिवशी ५० हजारांवर जाते. हे बहुतेक भाविक मेट्रो- ३ मार्गावरून प्रवास करतील असा अंदाज आहे. त्यामुळे उत्पन्नातील वाढीसाठी सिद्धिविनायक मंदिर मेट्रो स्थानकातील काही जागेचा वाणिज्यिक वापर केला जाणार आहे.**